S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 21/04/2025**

## Activity Name: Day Special


## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष

## विनोदी, उपहासात्मक साहित्यिक मार्क ट्वेन



मार्क ट्वेन हे विनोदी आणि उपहासात्मक साहित्यिक, समाजवादी आणि निरीश्वरवादाचे पुरस्कर्ते, निबंधकार, कथाकार आणि २८ अजरामर साहित्यकृतींचे जनक होते. गुलामगिरी, वर्णद्वेष या विषयावर निर्भीडपणे मत व्यक्त करणारा व्याख्याता म्हणून जगभर ते ओळखले जात. त्यांचा जन्म ३० नोव्हेंबर १८३५ रोजी झाला. मार्क ट्वेन यांचे खरे नाव सैमुअल ल. क्लेमेंस. वडिलांचे नाव जॉन मर्शमल क्लेमेंस अणि आईचे नाव जेन लम्पटो क्लेमेंस होते. जॉन हे टेनसी देशाचे व्यापारी होते व आई गृहिणी होती. हैली हा धूमकेतु दर ७५वर्षांनी पृथ्वीच्या जवळून जातो. १८३५ मधे हैली धूमकेतु पृथ्वी जवळून गेल्यानंतर दोनच हप्त्याने मार्क ट्वैन यांचा जन्म फ्लोरिडा, मिसिसीपीमधे झाला. त्यांचा जन्म सातव्या महिन्यातच झाल्यामुळे ते नेहमी अशक्त व आजारी असत. त्याची आई जेन सांगत 'मी जेव्हा त्याला पहिल्यांदा पाहिले, तेव्हा तो जगेल की नाही याची मला शंका आली होती.

१८३९ मधे वयाच्या ४ वर्षी क्लेमेंस फॅमिली हॉनिबल, मिसिसिपी इथे स्थलांतर झाली. हॉनिबलमधे गुलामगिरी होती. तिथे गुलमांना क्रुरतेने वागवले जात असे. पुढे जाऊन याच विषयावर मार्क ट्वेन यांनी आपल्या लेखनातून टीका केली. मार्क ट्वेन यांच्या आईचा स्वभाव हसरा,आनंदी आणि मनमिळाऊ होता. याच्या अगदी उलट त्यांच्या वडिल्याचा स्वाभाव होता. ते कडक शिस्तीचे होते. मार्क यांनी त्यांना कधीच हसताना पाहिलेले नव्हते. १८४६मधे वयाच्या ११ व्या वर्षी मार्क ट्वेन यांचा वडिलांचे न्युमोनियामुळे निधन झाले. वडिलांच्या झालेल्या अकस्मात निधनामुळे त्यांना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागला होता. मार्क ट्वेन यांचे निधन २१ एप्रिल १९१० रोजी झाले.

Nashik Edition

Apr 21, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401